# 'नियमित प्रसिध्दी पत्रक'
# पोलीस अधीक्षक कार्यालय,उस्मानाबाद.

**रविवार दि.१२/०२/२०२३**

---

## "मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई."

उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि. ११ फेब्रुवारी रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी **एकुण १२५ कारवाया करुन १,१२,३०० ₹ 'तडजोड शुल्क' वसुल केले आहे.**

## " अवैध मद्य विरोधी कारवाई ."

**अवैध मद्य विरोधी कारवाई दरम्यान उस्मानाबाद पोलीसांनी दि.११.०२.२०२३ रोजी जिल्हाभरात एकुण ६ कारवाया केल्या. यात घटनास्थळावर आढळलेली ७८ लि.गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या ६३ सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त केले. जप्त केलेल्या मद्याची एकुण अंदाजे १३,०२० ₹ असून पोलीसांनी संबंधीत व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५ (ई) अंतर्गत संबंधीत पो.ठा.येथे खालील प्रमाणे गुन्हे नोंदवले आहेत.**

**१)तुळजापूर पोठाच्या पथकास** आपसिंगा ता.तुळजापूर येथील- पांडूरंग गादे हे २१.०५ वा. सु.आपसिंगा ते तुळजापूर रोडलगत दोस्ती हॉटेल समोर एकुण २४ देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले. तर आपसिंगा ता.तुळजापूर येथील- बालाजी क्षिरसागर हे १३.४५ वा. सु. आपसिंगा शिवारातील पत्रा शेड समोर एकुण ३९ देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले आढळले.

**२)येरमाळा पोठाच्या पथकास** तेरखेडा, ता. वाशी येथील- त्रिंबक कसबे हे १५.३० वा. सु. तेरखेडा ते कडकनाथवाडी जाणारे रोडलगत पत्रा शेड समोर एकुण १० गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले, आढळले.

**३) शिराढोण पोठाच्या पथकास** शिराढोण ग्रामस्थ- मंगल पवार ह्या १९.४० वा. सु. शिराढोण येथे ६ लि. गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेल्या आढळल्या.

**४) ढोकी पोठाच्या पथकास** गोर्वधनवाडी, ता. उस्मानाबाद येथील- रणजित शिंदे हे २०.०० वा. सु.गावातील आपल्या राहत्या घरा समोर एकुण ४० लि. गावठी अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले आढळले.

**५) उमरगा पोठाच्या पथकास** कोळेवाडी, ता. उमरगा येथील- शिवानंद पालमपल्ले हे १७.४० वा. सु. नाईचाकुर ते कासार शिरशी जाणारे रोडलगत एकुण २२ लि. गावठी अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले आढळले.

यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अंतर्गत संबधीत पो.ठा. येथे स्वतंत्र ६ गुन्हे नोंदवले आहेत.

## " जुगार विरोधी कारवाई."

**जुगार विरोधी कारवाई दरम्यान उस्मानाबाद पोलीसांनी काल दि.११.०२.२०२३ रोजी ६ ठिकाणी छापे टाकले. या छाप्यात घटनास्थळावरील जुगार साहित्यासह रक्कम असा एकुण १३,०२० ₹ माल जप्त करुन संबंधीत व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अंतर्गत संबंधीत पो.ठा. येथे खालील प्रमाणे गुन्हे नोंदवले आहेत.**

**१)** उस्मानाबाद शहर पो. ठा. च्या पथकाने १४.०० ते १४.३० वा. दरम्यान उस्मानाबाद पो. ठा. हद्दीत २ छापे टाकले. यात रामनगर, उस्मानाबाद ग्रामस्थ- अविनाश गवळी हे भवानी चौक ते सांजा गावात जाणारे रोडलगत कल्याण मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह एकुण १,३५० ₹ रक्कम बाळगलेले, तर ज्ञानेश्वर नगर, उस्मानाबाद ग्रामस्थ- असलम पठाण हे सांजा चौक देशमुख यांच्या दुकाना समोर कल्याण मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह एकुण ५६० ₹ रक्कम बाळगलेले असताना आढळले.

**२)**उमरगा पो. ठा. च्या पथकाने १५.३० वा. दरम्यान उमरगा पो. ठा. हद्दीत छापा टाकला. यात नाईचाकुर ता. उमरगा ग्रामस्थ- नागेश इटूबोने हे गावातील आपल्या घरासमोर कल्याण मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह एकुण ७८० ₹ रक्कम बाळगलेले असताना आढळले.

**३)**भुम पो. ठा. च्या पथकाने ११.१० वा. दरम्यान भुम हद्दीत छापा टाकला. यात लक्ष्मीनगर, भुम ग्रामस्थ- कुणाल शिंदे हे फलोरा चौक भुम येथे ऑनलाईन चक्री जुगार चालवण्याच्या साहित्यासह एकुण ८,७२०₹ रक्कम बाळगलेले असताना आढळले.

**४)**कळंब पो. ठा. च्या पथकाने ११.३० वा. दरम्यान कळंब हद्दीत छापा टाकला. यात ईटकुर, ता. कळंब ग्रामस्थ- रसुल सय्यद,हनुमंत चव्हाण हे दोघे गावातील बाजार मैदान येथे पत्रा शेड मध्ये कल्याण मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह एकुण १,२५०₹ रक्कम बाळगलेले असताना आढळले.

**५)**तुळजापूर पो. ठा. च्या पथकाने १५.१५ वा. दरम्यान तुळजापूर हद्दीत छापा टाकला. यात आपसिंगा, मा. तुळजापूर ग्रामस्थ-अविनसश रोकडे हे गावातील जनावरांच्या दवाखाना समोर कल्याण मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह एकुण ३६० ₹ रक्कम बाळगलेले असताना आढळले.

यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अंतर्गत संबधीत पो.ठा. येथे स्वतंत्र ६ गुन्हे नोंदवले आहेत.

## “ मद्यपी चालकावर गुन्हा दाखल.”

**तुळजापूर पोलीस ठाणे :** जवाहर गल्ली, तुळजापूर ग्रामस्थ- विशाल रमेश वाघमारे दि.११.०२.२०२३ रोजी १९.३० वा. सु. आपल्या ताब्यातील मोटरसायकल ही तुळजापूर येथील जुने बसस्थानक रस्त्यावर मद्यधुंद अवस्थेत चालवून मो.वा.का. कलम- १८५ चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंदवला आहे.

## “ मारहान.”

**उस्मानाबाद (ग्रा) पोलीस ठाणे :** लाईटचे कनेक्श्न तोडल्याच्या कारणावरुन दिपकनगर तांडा, ता. तुळजापूर येथील- बाबु सिताराम राठोड यांना दि. १२.०१.२०२३ रोजी १०.३० वा. सु. बावी आश्रम शाळेच्या पाठीमागे गावकरी- महादेव राठोड, गोविंद पवार, प्रभाकर पवार यांनी संगणमताने ठार मारण्याच्या उद्देशाने बाबु यांना मारहान केली. तर लाईटच्या पोलवर चढल्याने बाबु यांचा मृत्यु होईल हे माहित असताना सुध्दा लाईटचे पोलवर चढवून लाईट जोडून दे असे म्हणाले. त्यावर बाबु हे पोलवर चढून लाईट जोडून देत असताना अचानक लाईट आल्याने बाबु यांना शॉक लागून ते खाली पडून गंभीर जखमी होवून बेशुध्द झाले. यात महादेव, गोविंद व प्रभाकर हे बाबु यांना बेशुध्द अवस्थेत टाकून पसार झाले. अशा मजकुराच्या बाबु राठोड यांनी दि.११.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३०७, ३२३, ५०६, ३४ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**“ आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यावर गुन्हा दाखल.”**

**वाशी पोलीस ठाणे :** तांदुळवाडी ता. वाशी येथील- अशोक नारायण चौधरी वय ६६ वर्षे यांनी सन २०१८ ते दि. ०८.०२. २०२३ रोजी १६.०० वा. सु. तांदुळवाडी येथे आत्महत्या केली. महालदारपुरी, ता.वाशी येथील- बंडु ऊर्फ दादासाहेब किसन गवारे यांच्याकडे घेतलेल्या पैशाचा तगादा लावल्याने अशोक यांनी त्यांच्या त्रासास कंटाळून आत्महत्या केली आहे. अशा मजकुराच्या मयताचा मुलगा- अजय चौधरी यांनी दि. ११.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३०६ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**“लोकशेवकाच्या कर्तव्यात अडथळा करणाऱ्यावर गुन्हा नोंद.”**

**नळदुर्ग पोलीस ठाणे :** स्वारगेट पुणे बस आगारातील बस क्र एमएच १४ बी. टी. ४७७५ ही नळदुर्ग बसस्थानक येथे दि.१०.०२.२०२३ रोजी १५.०० वा. सु. आली असता तिकीटाचे उरलेले पैसे देण्याचे कारणावरून वाहक-परमेश्वर नाथराव केंद्रे रा. कोंडवा बु.येवलेवाडी पुणे यांना व चालक यांच्याशी हुज्जत घालून, अरेरावीची, असभ्य भाषा करुन वाद घालून लाथाबुक्यांनी मारहान करून शासकिय कामात अडथळा निर्माण केला. जिवे मारण्याची धमकी दिली. यावरुन वाहक- केंद्रे यांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन दि.११.०२.२०२३ रोजी भा.दं.सं. कलम- ३५३, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**“ मालमत्तेविरुध्द गुन्हे.”**

**वाशी पोलीस ठाणे :** ईट, ता. भुम येथील-त्रिशाला साहेबराव सांगवीकर यांच्या घराचे दि. ०९.०२.२०२३ रोजी १७.०० ते दि १०.०२.२०२३ रोजी १९.०० वा. सु.कुलूप तोडून रोख रक्कम २,९८,२१८ ₹ सह ५९ ग्रॅम वजनाचे सुवर्ण दागिणे असा एकुण ४,९२,५९० ₹ किंमतीचा माल हा अणदुर, ता. भुम येथील मिना ओव्हळ, सुभाष ओव्हळ, वैशाली ओव्हळ यांनी चोरुन नेला. अशा मजकुराच्या त्रिशाला सांगवीकर यांनी दि. ११.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४५४, ४५७, ३८०, ३४ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**शिराढोण पोलीस ठाणे :** देवधानोरा, ता. कळंब येथील- अनिल मधुकर बुधवंत यांची मुलगी दि. ११.०२.२०२३ रोजी ०५.१५ वा. सु. तन्ही ही किराना दुकानातुन किराणा घेउन येत होती. देवधानोरा येथील - सागर शहाजी बोंदर हा तन्हीस म्हणाला की थांब तुझ्या कानातील पडयाला झाले आहे. असे म्हणून तन्हीच्या कानातील अर्धा ग्रॅमचे सुवर्ण दागिणे अंदाजे २५०० ₹ किंमतीचे चोरून नेले. अशा मजकुराच्या अनिल बुधवंत यांनी दि.११.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

---

जनसंपर्क विभाग उस्मानाबाद पोलीस